बुधवार, दि ११ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २३ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### नूतन महापौराचा पहिल्याच दिवशी पाहणी दौरा

## विसर्जन जलकुंडाच्या सोयीसुविधा अन् सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टिने कार्यवाहीचे आदेश





**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या नूतन महापौर वंदना मगरे यांनी आपल्या कार्यकाळाच्या पहिल्या दिवशी शहराच्या विकासासाठी महत्वाचे पाऊले उचलली आहेत. महापौरांनी विसर्जन जलकुंड परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली आणि त्यात त्यांनी काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर कडक आदेश दिले. विसर्जन जलकुंड हे जालना शहरातील एक महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक केंद्र आहे. शहरातील विसर्जनाच्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर, येथील सोयीसुविधा आणि सुरक्षा व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. महापौर वंदना मगरे यांनी या परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली आणि काही तातडीच्या आवश्यक बाबींची पाहणी केली. त्यानुसार, त्यांनी पुढील कार्यवाहीसाठी आदेश दिले. यात परिसराच्या सुरक्षिततेसाठी मजबूत संरक्षण भिंत उभारण्याचे आदेश महापौरांनी दिले. यामुळे जलकुंड परिसरातील सुरक्षेची पातळी सुधारण्यास मदत होईल आणि अनधिकृत प्रवेश रोखता येईल., संपूर्ण परिसरात योग्य प्रकाश व्यवस्था स्थापित करण्याच्या बाबीवर महापौरांनी भर दिला आहे. विद्युत कार्यांची पूर्तता केल्याने रात्रीच्या वेळेस देखील या परिसराची सुरक्षा सुनिश्चित होईल आणि स्थानिक नागरिकांची सोय होईल. महापौरांनी जलकुंडाच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी कायमस्वरूपी वॉचमन नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या. यामुळे परिसराच्या सुरक्षिततेला एक मजबूत आधार मिळेल, खासकरून सार्वजनिक कार्यक्रमांच्या दरम्यान. महापौर वंदना मगरे यांचा हा पहिला सार्वजनिक दौरा त्यांच्या आक्रमक विकास धोरणाचे संकेत देतो. त्यांचा लक्ष मुख्यतः सुरक्षा आणि सोयीसुविधांचा विकास करण्यावर आहे, ज्यामुळे शहराच्या प्रतिमेतील वाढ होईल आणि नागरिकांना चांगली सेवा मिळेल.

महापौरांनी इंजिनिअर्स व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली आणि तातडीने कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

महापौरांच्या या पाहणी दौऱ्यात मनोज इंगळे, इंजिनिअर सय्यद साऊद, प्रशांत खरात, रणजीत मगरे, निखिल मगरे यांच्यासह महानगरपालिकेचे इतर पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यामुळे कार्यवाहीत सहकार्याची भावना आणि एकात्मतेचे प्रतीक आहे.

महापौर वंदना मगरे यांनी जे आदेश दिले आहेत, ते शहराच्या सार्वजनिक विकासाशी संबंधित आहेत. यामुळे त्यांचे विकास धोरण स्पष्ट होईल की ते केवळ राजकीय दृष्टिकोनातून नव्हे, तर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करीत आहेत. यासोबतच, विसर्जन जलकुंडाचा विकास केल्याने शहरातील सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्वाच्या स्थळाचे संवर्धन होईल. महापौर वंदना मगरे यांच्या नेतृत्वाखाली जालना महानगरपालिकेने आपले विकास कामे धडाक्यात सुरू केली आहेत. विसर्जन जलकुंडाच्या प्रलंबित कामाची सुरुवात आणि सुरक्षा व सोयीसुविधांच्या बाबतीत तातडीने घेतलेली निर्णय प्रक्रिया यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळेल. यापुढे अशी पाऊले आणखी वेगाने उचलली जातील, ज्यामुळे जालना शहराचा विकास निश्चितच गति घेईल.

### वाटूर येथे भगस हॉस्पिटलचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते उदघाटन

## ग्रामीण भागात अधिकाधिक दर्जेदार आरोग्य सेवा द्या - लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी - तालुक्यातील** वाटूर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या भगस हॉस्पिटलचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. ग्रामीण व परिसरातील नागरिकांना दर्जेदार, आधुनिक आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा मिळाव्यात, हा उद्देश या रुग्णालयामागे असून या उपक्रमाचे आमदार लोणीकर यांनी विशेष कौतुक केले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले, ग्रामीण भागातील नागरिकांना आजही चांगल्या उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे जावे लागते. ही गरज ओळखून वाटूरसारख्या ठिकाणी आधुनिक सुविधा असलेले रुग्णालय सुरू होणे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे.

भगस हॉस्पिटलने अधिकाधिक रुग्णांना उत्तम, तत्काळ व माफक दरात उपचार देऊन समाजसेवेचे आदर्श निर्माण करावेत, असे त्यांनी सांगितले.

भगस हॉस्पिटलमध्ये आधुनिक तपासणी यंत्रणा, अद्ययावत उपचार पद्धती, आपत्कालीन सेवा, प्रयोगशाळा, प्रसूती विभाग तसेच सर्वसामान्य रुग्णांसाठी विशेष सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांना जालना, औरंगाबाद किंवा इतर मोठ्या शहरांत जाण्याची गरज कमी होणार आहे.

या वेळी रुग्णालयाचे संचालक व डॉक्टरांनी भगस हॉस्पिटलच्या उद्दिष्टांची माहिती देताना सांगितले की, रुग्णसेवा हीच खरी सेवा मानून आम्ही काम करणार आहोत. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी विशेष सवलती, मोफत तपासणी शिबिरे आणि जनजागृती उपक्रम राबवले जाणार आहेत.



कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानंतर आमदार लोणीकर यांनी रुग्णालयाची पाहणी करून उपलब्ध सुविधांचे कौतुक केले. भगस हॉस्पिटलच्या माध्यमातून वाटूर व परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी संभाजी वारे, बद्री खवणे सयाजीराव भगस माधव सिंग जनकवर उद्धव वायाळ लक्ष्मणराव भगस रामकिसन वायाळ सचिन टेकाळे संदीप तनपुरे गजानन केशरखाणे गणेश सोनवणे श्रीराम सूर्य गणेश वायाळ राजू माने जगदीश पडुळकर राजेंद्र वायाळ राधाकिसन माने बाळासाहेब आंबेरे नजीर पटेल सालर पठाण खालेक पठाण डॉ रमेश खांडेभराड डॉ.सचिन वायाळ उमेश माथणे आसाराम महात्मे यांच्यासह व्यापारी शेतकरी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जालना जिल्हाधिकारी कार्यालयात ‘सेफर इंटरनेट डे’ निमित्त विशेष कार्यशाळा संपन्न



जालना । प्रतिनिधी - जिल्हा सूचना विज्ञान केंद्र (NIC) यांनी ‘सेफर इंटरनेट डे’ निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन, येथे आज इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदारीने वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन केले होते. इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर सुरक्षा आणि ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश शासकीय कामकाजात तसेच वैयक्तिक स्तरावर इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी आणि तांत्रिक बाबींबाबत माहिती देणे हा आहे. सर्व शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सूचना विज्ञान केंद्र यांनी केले आहे.

या कार्यशाळेस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, प्रा. संदीप काळे, जिल्हा सूचना विज्ञान केंद्राचे भूषण लोखंडे, रामेश्वर भोसले, दिपेंद्र जयस्वाल यांच्यासह विविध विभागातील अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## संपादकीय


# डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा !

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डे पासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे , चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा माहोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्या आवडत्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाच्या फुलाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण आलेले असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेजच्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील स्मितहास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते आपल्या आवडत्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी, आपल्या आवडत्या व्यक्तीला भेटवस्तू वस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डेची गरज नसते. बरे हे डेज पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनियर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अती झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मिडीयावर ॲक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई वडिलांप्रती प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप एक्टिव असतात. जन्मदात्या आई वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमुल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

## रेवगाव येथे बारावीच्या परीक्षार्थींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत

# ‘कॉपीमुक्त’ वातावरणात परीक्षेस सुरुवात





**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेला आजपासून उत्साहात सुरुवात झाली. रेवगाव (ता. जि. जालना) येथील किंग शिवाजी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

फुलांनी झाले स्वागत

आज १० तारखेला सकाळी ११:00 वाजता इंग्रजी विषयाचा पहिला पेपर होता. परीक्षेच्या तणावात असलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. नांद्रे सर यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी परीक्षा केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शिक्षकांच्या या प्रेमळ कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमलले आणि त्यांचा आत्मविश्वास दुणावलेला पाहायला मिळाला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अभियानाला प्रतिसाद

जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्ह्यात 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबवण्याचे आदेश दिले आहेत. या आवाहनाला प्रतिसाद देत किंग शिवाजी महाविद्यालयात अत्यंत कडक शिस्त आणि शांततेत परीक्षेचे नियोजन करण्यात आले होते. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार न घडता, पारदर्शक आणि कॉपीमुक्त वातावरणात विद्यार्थ्यांनी आपला पहिला पेपर सोडवला.

विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती कमी व्हावी आणि त्यांनी आनंदी वातावरणात पेपर लिहावा, या उद्देशाने आम्ही त्यांचे स्वागत केले. जिल्हाधिकारी महोदयांच्या मार्गदर्शनानुसार आमचे केंद्र पूर्णपणे कॉपीमुक्त ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे प्राचार्य श्री. नांद्रे, किंग शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, रेवगाव. यांनी म्हटले आहे.

केंद्रावर परीक्षेची जय्यत तयारी करण्यात आली होती. पहिल्याच दिवशी इंग्रजीचा पेपर सोपा गेल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या या सकारात्मक उपक्रमाचे पालक आणि शिक्षण वर्तुळातून कौतुक होत आहे.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# छत्रपतींच्या महाराष्ट्रात हिंदू सुवासिनींच्या मंगळसूत्राला हात लावणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा!

## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ हिंदुत्वनिष्ठ महिलांची घोषणाबाजी!




**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या या पावन भूमीत हिंदू सुवासिनींच्या मंगळसूत्राला हात लावला जातो, हा निधर्मी प्रशासनाचा मुजोरपणा आहे. सुरक्षा तपासणीच्या नावाखाली हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अन्यथा हिंदू समाज शांत बसणार नाही, असा इशारा हिंदु जनजागृती समितीच्या समन्वयक कु. प्रियांका लोणे यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर येथे ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या 'सीटीईटी' (उढएढ) परीक्षेच्या केंद्रावर हिंदू महिलांचे पवित्र मंगळसूत्र आणि दागिने उतरवायला लावल्याच्या निषेधार्थ आज हिंदु जनजागृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी करण्यात आली. या वेळी आंदोलकांनी प्रशासनाच्या हिंदूद्वेषी धोरणाविरुद्ध घोषणाबाजी करत जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर केले. या वेळी शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या सौ. सारिका कोलते आणि रणरागिणी शाखेच्या कु. श्रुती सिरसाट यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रियंका लोणे म्हणाल्या की, हिंदू धर्मात मंगळसूत्र हे केवळ सौभाग्यलेणे नसून ते श्रद्धेचे प्रतीक आहे. अन्य धर्मीयांच्या धार्मिक चिन्हांच्या बाबतीत 'धार्मिक स्वातंत्र्य' जपणाऱ्या प्रशासनाला केवळ हिंदूंच्याच दागिन्यांमध्ये 'मेटल' का दिसते? हा दुजाभाव आता खपवून घेतला जाणार नाही. भारतीय संविधानाचे कलम २५ प्रत्येक नागरिकाला धार्मिक आचरण करण्याचा अधिकार देते. परीक्षेच्या नावाखाली हिंदू महिलांची ही विटंबना संविधानाचा अपमान करणारी आहे.परीक्षा केंद्राबाहेर उघड्यावर लाखो रुपयांचे दागिने ठेवायला लावणे हा महिलांच्या सुरक्षिततेशी खेळ आहे. जर हे दागिने चोरीला गेले असते, तर त्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घेतली असती का? असा संतप्त सवाल या वेळी उपस्थित करण्यात आला.

या वेळी मागण्यामध्ये दोषी केंद्र प्रमुख आणि कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करा. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) हिंदूंच्या धार्मिक अलंकारांना (मंगळसूत्र, जोडवी, नथ, बिंदी) परीक्षेला बसताना मुभा असल्याचे स्पष्ट परिपत्रक काढावे. तसेच भविष्यात असा प्रकार घडल्यास तीव्र लोकआंदोलन छेडले जाईल, असा इशारा प्रशासनाला देण्यात आला.

# लबाडांची लबाडी उघडी झाली

## प्रमोद तोतला यांचा अध्यक्ष साईनाथ पवारांवर गंभीर आरोप



> **"मी खात्रीने सांगतो की यांनी हिशोबात गडबड केली आहे, म्हणूनच हे मीटिंग न घेता तोंड लपवून पळत आहेत. ताठ मानेने फिरायचे असेल तर तातडीने मीटिंग लावा आणि व्हाउचरसहित हिशोब सादर करा.**
> **- प्रमोद तोतला**

### तालुकाध्यक्षांचे पत्र आणि आर्थिक अनियमिततेच्या मुद्द्यावरून संघटनेत खळबळ

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील एका प्रतिष्ठित संघटनेतील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आला असून, संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार आणि जितेंद्र लखोटिया यांच्यावर आर्थिक अपहाराचे आणि दिशाभूल करण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. लबाडांची लबाडी आता उघडी झाली आहे, अशा तिखट शब्दांत संघटनेचे पदाधिकारी प्रमोद तोतला यांनी अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

पाच दिवसांपूर्वी अध्यक्ष साईनाथ पवार यांनी काही दैनिक वृत्तपत्रांमधून 'संघटनेचे काम नियमाप्रमाणे सुरू असून दर तीन महिन्यांनी ई.सी. मीटिंग घेऊन हिशोब दिला जातो', असा दावा केला होता. मात्र, प्रमोद तोतला यांनी हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. तालुकाध्यक्षांनी लेखी पत्राद्वारे कळवले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून अशी कोणतीही मीटिंग झाली नाही आणि हिशोबही सादर करण्यात आलेला नाही. तोतला यांनी पत्रात म्हटले आहे की, हिशोब मागणाऱ्यांना उत्तरे देण्याऐवजी अध्यक्ष दिशाभूल करत आहेत.

कोणाला सांगतात आ. अप्पासाहेबांकडे हिशोब दिला. कुणाला सांगतात मंगेश वाणींकडे दिला. प्रत्यक्षात ज्यांनी हिशोब मागितला, त्यांना मात्र अंधारात ठेवले जात आहे.

**तरी कारवाई होणारच**

अध्यक्षांना वाटते की संघटना रजिस्टर्ड नसल्यामुळे त्यांच्यावर काहीच कारवाई होऊ शकत नाही, पण हा त्यांचा गोड गैरसमज आहे, असा इशारा तोतला यांनी दिला आहे. गल्लीत लहान मुलांनी बसवलेल्या गणपतीचाही हिशोब द्यावा लागतो, तिथे इतक्या मोठ्या संघटनेचा हिशोब का दिला जात नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आर्थिक अनियमितता हा मोठा गुन्हा असून याबाबत योग्य ठिकाणी तक्रार करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. प्रमोद तोतला यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, 'चांगल्या वकिलाचा सल्ला घ्या, नंतर म्हणू नका पूर्वकल्पना दिली नव्हती' असा सज्जड दमच अध्यक्षांना दिला आहे. आता या आरोपांवर अध्यक्ष साईनाथ पवार काय उत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुणवत्तापूर्ण रस्ते उभारणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** नेहमीचा पाऊस, वाढते तापमान, हवामानातील बदल यांचा विचार करून रस्ते बांधकाम करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. जिल्ह्यात रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होऊन टिकाऊ व सुरक्षित रस्ते निर्माण व्हावेत, या उद्देशाने रस्ते गुणवत्ता निरीक्षण (ठेरव टींरश्रळींू चेपळीीेळपस), बांधकाम व नवीन तंत्रज्ञान या विषयावर आज दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे भारतीय तंत्रज्ञान संस्था (खखढ) मुंबई येथील प्रा. डॉ. धर्मवीर सिंग यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भारतीय तंत्रज्ञान संस्था (खखढ) मुंबई येथील प्रा. डॉ. धर्मवीर सिंग, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एक श्रीमती स्मिता पवार, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन व्यंकट मिठेवाड, कार्यकारी अभियंता बांधकाम जिल्हा परिषद जालना श्रीमती सविता सलगर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, रस्ते हे केवळ दळणवळणाचे साधन नसून जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व ग्रामीण विकासाचा कणा आहेत. त्यामुळे रस्ते बांधकाम करताना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. प्रत्येक रस्ता दीर्घकाळ टिकणारा, सुरक्षित व मानकांनुसार असणे अत्यंत आवश्यक आहे.त्या पुढे म्हणाल्या की, रस्ते बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर - आराखडा, मटेरियल निवड, कामाची अंमलबजावणी व अंतिम गुणवत्ता तपासणी - यामध्ये काटेकोर निरीक्षण गरजेचे आहे. मुरूम, खडी, डांबर यांची घनता, आर्द्रता, एम.डी.डी. चाचण्या वेळेवर व योग्य पद्धतीने कराव्यात.

# वृक्षतोडीत आता अधिकाऱ्यांवरही होणार फौजदारी कारवाई: मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल - ॲड. धन्नावत

**जालना -**झाडे म्हणजे पृथ्वी आकाशावर लिहिलेली एक कविता आहे, या काव्यात्मक निरीक्षणासह, मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, वृक्षांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांचे 'कठोरपणे' पालन करणे अत्यावश्यक आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, वृक्षतोडीसाठी परवानगी देताना विहित प्रक्रियेचे पालन न करणारा अधिकारीदेखील महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ अंतर्गत फौजदारी कारवाईस पात्र ठरेल. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने पुणे महानगरपालिकेने (पीएमसी) चार नारळाची झाडे तोडण्यास 'निष्काळजीपणे' परवानगी दिल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

याचिकाकर्ते अभिजीत अंतुरकर यांनी पुणे शहरातील एरंडवणे भागातील चार नारळाची झाडे तोडण्यासाठी २०२० मध्ये वृक्ष प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीला आव्हान दिले होते. त्यांनी वृक्ष प्राधिकरणाच्या कामकाजातील त्रुटी, विशेषतः झाडे तोडण्यावर आक्षेप मागवण्यासाठी वर्तमानपत्रांमध्ये सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याच्या प्रक्रियेतील अनियमितता न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. पुणे महानगरपालिकेने दावा केला की, त्यांनी संबंधित झाडांवर नोटिसा चिकटवल्या होत्या. तथापि, खंडपीठाने नमूद केले की, वर्तमानपत्रात दिलेल्या सार्वजनिक सूचनांमध्ये आवश्यक तपशिलांचा अभाव होता, ज्यामुळे नागरिकांना प्रभावीपणे आक्षेप नोंदवणे अशक्य झाले.

न्यायालयाने अधोरेखित केले की, कायद्यानुसार आक्षेप मागवण्याचा उद्देश तेव्हाच सफल होतो, जेव्हा नागरिकांना झाडांचे नेमके ठिकाण, ती का तोडली जात आहेत आणि कोणाच्या विनंतीवरून तोडली जात आहेत, याची स्पष्ट माहिती मिळेल. प्रत्येक नागरिकाने महानगरपालिकेच्या वेबसाइटला भेट देऊन माहिती मिळवावी, अशी अपेक्षा करणे अवास्तव आहे. न्यायालयाच्या मते, महानगरपालिकेने जारी केलेली नोटीस केवळ एक वरवरची कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्याचा प्रकार होता. जर पर्यावरणाची काळजी करणाऱ्या नागरिकांकडून खऱ्या अर्थाने आक्षेप मागवायचे असतील, तर झाडांविषयीची अचूक माहिती देणे बंधनकारक आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे न्यायालयाने कायद्याच्या कलम २१ कडे लक्ष वेधले. हे कलम कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी दंड आणि शिक्षेची तरतूद करते. यानुसार, कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून किंवा विनाकारण वृक्ष अधिकाऱ्याच्या किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या आदेशाचे पालन न करता कोणीही झाड तोडल्यास किंवा तोडण्यास कारणीभूत ठरल्यास, त्या व्यक्तीस झाडाच्या मूल्यांकनाइतका दंड आणि किमान एक आठवड्यापासून ते एका वर्षापर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. न्यायालयाने स्पष्ट केले की, ही तरतूद केवळ सामान्य नागरिकांसाठी नसून, प्रक्रियेचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्यासाठी लागू होते. या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत म्हणाले, मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल ऐतिहासिक आणि स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये कायद्याविषयी गांभीर्य निर्माण होईल आणि ते मनमानी पद्धतीने वृक्षतोडीस परवानगी देण्यापासून परावृत्त होतील. हा निकाल केवळ पुणे महानगरपालिकेपुरता मर्यादित नसून, राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांसाठी एक आदर्श उदाहरण आहे. या निर्णयामुळे पर्यावरण संरक्षणाच्या लढाईला मोठे बळ मिळाले असून, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

न्यायालयाने नमूद केले की, या कायद्याचा मुख्य उद्देश वृक्षतोड थांबवणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे हा आहे. अगदी अपरिहार्य परिस्थितीत झाडे तोडावी लागली, तरी नवीन झाडे लावून त्याची भरपाई करणे बंधनकारक आहे. कायद्याच्या उल्लंघनाकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले पाहिजे आणि त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर, प्रक्रियेचे पालन करण्यात अयशस्वी ठरलेल्या अधिकाऱ्यावरही गुन्हा दाखल केला पाहिजे, असे न्यायालयाने बजावले.

जरी या प्रकरणातील झाडे आधीच तोडली गेली असली तरी, न्यायालयाने भविष्यासाठी अधिकाऱ्यांना कठोर शब्दांत ताकीद दिली. 'रोहित मनोहर जोशी विरुद्ध वृक्ष प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका' या प्रकरणातील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निरीक्षणांसह खंडपीठाने याचिका निकाली काढली.

या निकालातून सर्वसामान्य नागरिक आणि प्रशासकीय अधिकारी या दोघांनीही बोध घेण्यासारखा आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील पर्यावरणाबाबत जागरूक राहून, बेकायदेशीर वृक्षतोडीविरोधात आवाज उठवला पाहिजे. त्याचबरोबर, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, कायद्याची प्रक्रिया केवळ एक सोपस्कार नसून, त्याचे उल्लंघन केल्यास त्यांना वैयक्तिकरित्या फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागू शकते. हा निकाल न्यायव्यवस्थेच्या पर्यावरण संरक्षणातील सक्रिय भूमिकेचे आणि कायद्याच्या राज्याच्या सर्वोच्चतेचे प्रतीक आहे.

# युवकांनी जीवनात संकटात खचून जाऊ नये, दुःख माणसाला प्रेरणा देते

## मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे

**जालना | प्रतिनिधी -** युवकांनो जीवनात कितीही संकटे चढउतार येऊ द्या खचून जाऊ नका, दुःख माणसाला प्रेरणा देते. असे प्रतिपादन जालनात जेइएस महाविद्यालयाच्या 'युवा जल्लोष' सप्ताह अंतर्गत स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी केले.

जेइएस महाविद्यालय जालना येथे युवा जल्लोष सप्ताह या कार्यक्रमांतर्गत स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी जालना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया होते, व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री. श्रीनिवास भक्कड व उपाध्यक्ष फुलचंदजी भक्कड , प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, उपप्राचार्य डॉ .महावीर सदावर्ते पर्यवेक्षक डॉ.सुमंत बिक्कड, प्रा.ज्ञानेश्वर धनवे तसेच विद्यार्थी संसद सचिव कुमारी संस्कृती संगम व विद्यार्थी प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती .

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले शैक्षणिक वर्ष २०२ -२६ मध्ये महाविद्यालयात घेतलेल्या विविध उपक्रमांची व महाविद्यालयाने संपादित केलेले यश व शैक्षणिक क्षेत्रात घेतलेली भरारी याची इत्याभूत माहिती दिली. आज जगभर जेइएस महाविद्यालयचे विद्यार्थी मोठ्या पदावर काम करत असल्याचेही सांगून त्यांनी उद्योग, व्यवसायातही नावलौकिक कमावल्याचे प्राचार्य डॉ अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे म्हणाल्या की, युवकांना जीवनात कितीही संकटे आले ,तरी खचून जाऊ नये जीवनात असे चढउतार येत असून त्याला सामोरे जावे, दुःख माणसाला प्रेरणा देते , जगणं शिकवते यातून माणसाचं मन सभेतील घडतं, त्यांच्या चित्रपटातील अनेक प्रसंग त्यांनी यावेळी सांगितले वेगवेगळ्या भूमिका करत




असताना स्त्रीला कोणत्या दुःख वेदना सहन करावा लागतात याविषयी त्यांनी सांगितले, बालरंगभूमीवर ही मी भूमिका केल्याचे सांगून कला व संस्कृती याचा संगम बालरंगभूमीत दिसतो. साधना व तपश्चर्या यामधूनही कलावंत , अभिनेता घडत असल्याचेही वैशाली दाभाडे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध असून त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेऊन नावलौकिक कमवावा, आवडीच्या क्षेत्रामध्ये करिअर करावे असेही श्री .बगडिया यांनी सांगितले.

यावेळी युवा जल्लोष चे प्रमुख प्रा डॉ. हेमंत वर्मा, प्रा. डॉ. गणेश रोकडे, प्रा मनोज मेहर, प्रा डॉ लक्ष्मीकांत शिंदे,प्रा डॉ सुखदेव मांटे, प्रा डॉ किशोर तापडिया,प्रा डॉ यशवंत सोनूने, प्रा डॉ उमेश मोगले, प्रा डॉ राजेश सरकटे, आदि, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन बावस्कर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी मानलेत.




**आजपासून बारावीच्या परीक्षाची सुरुवात झाली जालना येथील जे ई एस महाविद्यालयात असलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींची गर्दी दिसून आली (छायाचित्र अनिल व्यवहारे)**

# रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी बेरोजगारांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबड येथे सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत संपन्न होणार आहे.

रोजगार मेळाव्यात ३०० पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी मेळाव्यापूर्वी अधिक माहितीसाठी व रिक्त पदांचा तपशील पाहण्यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळावरील 'आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' या पर्यायावर जाऊन 'जालना' जिल्हा निवडून आपली नोंदणी निश्चित करावी, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, जालना यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# जालना पोलीसांचे शहरात 'ऑलआऊट' व कोबिंग मोहिम

**जालना | प्रतिनिधी -** वाढत्या गुन्हेगारी वचक बसविण्यासाठी जालना पोलीसांचे जालना शहरात ऑलआऊट ऑपरेशन व कोबिंग मोहिम राबविण्यात आली.

जालना शहरात वाढत्या गुन्हेगारीवर वचक बसविण्यासाठी व आस्थापना वेळीच बंद करण्यासाठी पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दिनांक ०९/०२/२०२६ रोजी अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचे नेतृत्वाखाली जालना शहरात रात्री ११.०० वाजे पासुन ऑलआऊट ऑपरेशन राबविण्यात आले आहे. बसस्थानक, रेल्वे स्टेशन, शनिमंदीर परिसर, छत्रपती संभाजी नगर चौक, नुतन वसाहतयासह शहरातील विविध भागातील कारवाई दरम्यान जालना शहरातील अपरात्री सुरु असणारे आस्थापने बंद करुन आस्थापना धारक यांना त्यांच्या आस्थापणा वेळेत बंद करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे. तसेच आर्म ॲक्ट प्रमाणे या पुर्वी दाखल असलेले रेकॉर्ड वरील ५२ आरोपी चेक करुन १२ आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच कोबिंग दरम्यान अवैध वाळु वाहतुक करणारे एका हायवा वाहनांवर कारवाई करुन २५,३०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन हायवा चालक व मालक याचे विरुध्द पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधीकारी अनंत कुलकर्णी, श्रीमती जानवी शेखर परिविक्षाधिन पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्थागुशा जालना, पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार पोस्टे चंदनझिरा, पोलीस निरीक्षक संदीप भारती पोस्टे सदर बाज़ार, पोलीस निरीक्षक संतोष साबळे, पोलीस ठाणे तालका जालना, पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, पोस्टे कदिम जालना, यासह स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस ठाणे सदर बाजार, तालुका जालना, कदिम जालना, चंदनझिरा, आर.सी.पी चे असे एकुण १२६ पोलीस अमंलदार हजर होते.

### खासदार डॉ. कल्याण काळे यांची उपोषणस्थळी भेट

# शेतकरी हितासाठी कारखाना सुरु करू - डॉ. काळे




**जालना | प्रतिनिधी -** खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी, दुपारी १ वाजता आमरण उपोषण करणाऱ्या कारभारी महाराज अंभोरे यांची भेट घेतली. या भेटीमध्ये, खासदारांनी आंदोलनकर्त्यांशी उपोषणाच्या संदर्भात चर्चा केली, तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखाना कसा सुरू होईल यावर विचार विनिमय केला.

आमरण उपोषण करणारे कारभारी महाराज अंभोरे गेल्या चौदा दिवसांपासून शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर लक्ष केंद्रित करत होते. या उपोषणाद्वारे, शेतकऱ्यांचे प्रश्न, विशेषतः कारखाना सुरू करण्यासंबंधी असलेल्या मागण्यांवर दबाव आणला जात होता. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी या उपोषणाचे गांभीर्य ओळखून, आंदोलनकर्त्यांसोबत चर्चा केली आणि त्यांचे मुद्दे ऐकले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असल्याचे स्पष्ट केले आणि ते शेतकऱ्यांच्या पाठी ठामपणे उभे आहेत, असे आश्वासन दिले. त्यांच्या या आश्वासनामुळे आंदोलनकर्त्यांना दिलासा मिळाला आणि आगामी कारवाईसाठी एक सकारात्मक दिशा मिळाली.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकारी असीमा मित्तल यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधला. उपोषणाचा मुद्दा आणि शेतकऱ्यांच्या मागण्या या संदर्भात जिल्हाधिकारी मित्तल यांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे, शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी शिष्टमंडळाच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाशी थेट संवाद साधावा, यासाठी जिल्हाधिकारी मित्तल यांना सुचना दिल्या. या चर्चेसाठी शेतकरी नेते लक्ष्मणरावजी वडले, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष कल्याण दळे, संघर्ष समितीचे अध्यक्ष अंकुश देशमुख, आणि इतर शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकरी नेत्यांमध्ये नारायण वाडेकर, लक्ष्मण शिंदे, आशोक उबाळे, राम सावंत, एडवोकेट सोपानराव भांजे, उदय देशमुख, राजेंद्र गोरे, चंद्रकांत देशमुख, सुरज यंगटवार, लाला पाटील, लकडे बाबुराव थेटे इत्यादी शेतकरी व सभासदांचा समावेश होता. खा. डॉ. काळे यांच्या भेटीच्या माध्यमातून, शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले गेले आहेत, आणि शासन व प्रशासन स्तरावर योग्य पावले उचलण्याची शक्यता आहे.